# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.07.2024** **वारःगुरुवार**

---

1. पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षितता यांच्याद्वारे शाश्वत विकास धोरणांसाठी महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार
2. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत आतापर्यंत 7 हजार कोटींहून अधिक विमा रक्कम मंजूर.
3. आरक्षणाच्या मुद्द्यावरील गोंधळातच पुरवणी मागण्या मान्य;
4. मुस्लिम महिलांना पतीकडून पोटगी मिळवण्याचा अधिकार-सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा आणि
5. झिम्बाब्वेविरुद्ध तिसऱ्या वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारताचा विजय.

**कृषी-पुरस्कार**

पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षिता यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, 15व्या कृषी नेतृत्व समितीचा 2024 चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार काल नवी दिल्लीत स्विकारला.

पुरस्कार स्विकारताना मुख्यमंत्री म्हणाले की महाराष्ट्र कृषी क्रांतीचं जनक राज्य आहे. हा पुरस्कार राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांचं कष्ट, मेहनत आणि मातीवरच्या प्रेमाची ही फलश्रुती आहे. आमच्या शेतकऱ्यांना 'अन्नदाता' म्हणून मान दिला जातो आणि राज्य सरकारनं त्यांच्या हितांसाठी सर्वोच्च प्राधान्य दिलं असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं.

**पीक विमा**

राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप 2023 अंतर्गत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई म्हणून 7 हजार 149 कोटी 28 लाख रुपये विमा रक्क्म मंजूर झालेली आहे. त्यातून 3 हजार 965 कोटी 31 लाख रूपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले असून उर्वरित रक्कम वितरणाचं काम सुरू असल्याचं पुणे कृषी आयुक्तालयानं सांगितलं. केवळ एक रूपया भरुन राज्य सरकारच्या पीक विमा योजनेत सहभागी झाल्यामुळं पिकांच्या नुकसानापोटी शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. यावर्षीही पीक विमा योजनेत आधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावं असं आवाहन कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी केलं आहे.

**विधानसभा**

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात काल विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं करत, रस्ते अपघात, महिलांची सुरक्षितता आदी मुद्यांवरून घोषणा दिल्या. राज्यात भेसळयुक्त पदार्थ तपासण्यासाठी सध्या असलेल्या प्रयोगशाळा कमी पडत असल्यामुळं खासगी सहभागातून अशा प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी एक प्रस्ताव तयार करण्यात येत असून, तो मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी सादर केला जाईल, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्माराव अत्राम यांनी दिली.

नाशिक सातपूर एम आय डी सी मध्ये एकाच व्यावसायिकाला एकवीस भूखंड दिल्याच्या प्रकरणी चौकशी करुन गरज पडल्यास गुन्हा दाखल केला जाईल, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. सुहास कांदे यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. भूखंड वाटप केल्यावरही त्याचा वापर न करणाऱ्या कंपन्यांचे भूखंड परत घेण्याची प्रक्रिया राज्यभर सुरू असल्याचं सामंत यांनी सांगितलं.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील कायमस्वरूपी विनाअनुदानित, दिव्यांगांच्या विनाअनुदानित विशेष शाळा, संलग्न वसतिगृहं, कार्यशाळा आणि अनाथ, मतिमंदांची बालगृहे यांना अनुदान मंजुरीबाबत धोरण निश्चित करण्यात आलं आहे. या धोरणाला मंत्रिमंडळाची मंजुरी प्राप्त झाल्याची माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

**आरक्षण**

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरील सर्वपक्षीय बैठकीवर महाविकास आघाडीनं बहिष्कार टाकला. या मुद्द्यांवर विरोधकांना केवळ राजकारण करायचं आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीवर विरोधकांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी करत सत्ताधारी आमदारांनी विधानसभेत घोषणा दिल्या, या गदारोळातच दोन्ही सभागृहांमध्ये पुरवणी मागण्या मान्य करण्यात आल्या.

दरम्यान आरक्षणप्रकरणी सरकारनं सभागृहात भूमिका स्पष्ट करणं अपेक्षित असल्याचं विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. मराठा आरक्षणावर चर्चा न करता विधान परिषदेत सत्ताधारी आणि उपसभापती यांनी संगमतानं दिवसभराचं कामकाज स्थगित केल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. विरार-अलिबाग पट्टा, पुणे रिंग रोड प्रकल्प, वसई-विरार भूसंपादनातील गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी काल विधानसभेत केली.

**संपूर्णता**

संपूर्णता अभियानाच्या अंतर्गत नांदेड जिल्ह्यातल्या आशा, अंगणवाडी, आरोग्य सेविका आणि सेवक, परिचारिका, लेखनिक तसंच समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आलं आहे. नांदेड जिल्ह्यातल्या किनवड तालुक्याचे आरोग्य अधिकारी किशन गायकवाड यांनी ही माहिती दिली.....

**मुस्लिम महिला**

मुस्लिम महिलांनाही पतीकडून पोटगी मिळवण्याचा अधिकार असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठानं घटस्फोटित पत्नीला पोटगी देण्यास विरोध करणारी एक याचिका काल फेटाळून लावत, ही बाब स्पष्ट केली.

**गोंडगोवारी**

गोंड गोवारी समाजाच्या निवेदनांवर अभ्यास करण्यासाठी उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश के. एल. वडणे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभागाच्या वतीनं समिती नेमण्यात आली आहे. समितीच्या वतीनं नागपूर आणि अमरावती या ठिकाणी निवेदनं स्वीकारून त्यांचं म्हणणं ऐकून घेतलं जाणार आहे.

**गर्डर**

रायगड जिल्ह्यातल्या कोलाडजवळच्या पुई इथल्या नवीन पुलाचा गर्डर टाकण्याचं काम सुरू असल्यानं आजपासून 13 जुलै दरम्यान सकाळी 6 ते 8 आणि दुपारी 2 ते 4 या वेळात मुंबई - गोवा महामार्गावरील वाहतूक बंद ठेवली जाणार आहे. या काळात पर्यायी मार्गाचा वापर करण्यास सांगण्यात आलं आहे.

दरम्यान वरंध घाटदेखील 31 ऑगस्टपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याची अधिसूचना रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी काढली आहे. 19 जूनला झालेल्या जोरदार पावसानं दरड कोसळून रस्ता खचून वाहतुकीसाठी अत्यंत अरुंद आणि धोकादायक झाला आहे. पुण्याकडे जाण्यासाठी महाड-माणगांव-निजामपूर-ताम्हिणी घाट-मुळशी-पिरंगुट-पुणे असा मार्ग तसंच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळूण-पाटण-कराड-कोल्हापूर असा मार्ग वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**कोरे-रत्नागिरी**

दिवसभराच्या अथक परिश्रमांनंतर कोकण रेल्वेमार्गावरची वाहतूक पूर्ववत करण्यात काल यश आलं. पेडणे बोगद्यातून पहिली रेल्वेगाडी रवाना करण्यात आली, अशी माहिती कोकण रेल्वेचे रत्नागिरीतले जनसंपर्क अधिकारी सचिन देसाई यांनी दिली.

**रिफायनरी-रत्नागिरी**

नाचणी, फणसासह कोकणातल्या नैसर्गिक उत्पादनांच्या आधारे उद्योग वाढवायला हवेत शिवाय तेल शुद्धीकरण यासारखे उद्योगही व्हायला हवेत असं मत रत्नागिरी-सिंधदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे खासदार नारायण राणे यांनी काल रत्नागिरीत एका कार्यक्रमात व्यक्त केलं. जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसामुळं झालेल्या नुकसानाची भरपाई नागरिकांना मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**इग्नाईट-गडचिरोली**

गडचिरोली जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीनं काल 'इग्नाईट महाराष्ट्र' कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेत आयात-निर्यात व्यवसाय, कृषी आणि पर्यटन उद्योगातील संधी, व्यवसाय सुविधा केंद्र, लघु आणि मध्यम उद्योगांकरिता अर्थसहाय्य, डिजिटल कॉमर्स या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केलं. जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरणाचा लाभ नवउद्योजकांनी घ्यावा असं आवाहन जिल्हाधिकारी संजय दैने यांनी केलं.

**सत्याग्रह-यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यातल्या धुंदी इथं काल सत्याग्रह स्मारक प्रतिष्ठान आणि वन विभागाच्या वतीनं जंगल सत्याग्रह दिन पाळण्यात आला. देशाला स्वातंत्र्य मिळावं म्हणून महात्मा गांधी यांनी 1930 मध्ये 'सविनय कायदेभंग आंदोलन' सुरू करून दांडी इथं मिठाचा सत्याग्रह केला होता पण, विदर्भात समुद्र नसल्यानं बापूजी अणे यांनी वन कायदा तोडत जंगल सत्याग्रह केला.

**हडको निधन**

नांदेडमधल्या हडको इथले रहिवासी सीमा सुरक्षा दलाचे जवान नाईक कामेश कदम यांना हरियाणात कर्तव्य बजावत असताना काल वीरमरण आलं. ते 42 वर्षांचे होते. आज त्यांच्या पार्थीव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**परवाना रद्द**

पुणे शहरात मद्यपान करून अपघात होण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी मद्यपान करून गाडी चालवणाऱ्या चालकांचां परवाना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी मद्यपान करुन वाहन चालवल्यास केवळ खटला दाखल करून कारवाई केली जात होती. यापुढे मद्यपान करून गाडी चालवताना आढळून आला तर वाहन परवाना प्रथम 3 महिन्यांसाठी नंतर त्याच गुन्ह्याकरिता 6 महिन्यापर्यंत आणि तिसऱ्या वेळीस पुन्हा तीच व्यक्ती

हा गुन्हा करताना आढळून आली तर परवाना कायमस्वरूपी रद्द होणार असल्याची माहिती माहिती पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील वीस षटकांच्या पाच सामन्याच्या मालिकेतील तिसरा सामना काल भारतानं 23 धावांनी जिंकला. आणि मालिकेत 2-1 अशी आघाडी घेतली. कर्णधार शुभमन गिलच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतानं झिम्बाब्वेसमोर 182 धावांचं उद्दिष्ट ठेवलं होतं. प्रत्युत्तरादाखल यजमान संघाचा डाव 159 धावांत संपुष्टात आला. डीऑन माईर्सनं सर्वाधिक 65 धावा केल्या. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरनं सर्वाधिक 3 बळी घेतले. मालिकेतील चौथा सामना 13 जुलैला होणार आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर आणि विदर्भात वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र तुरळक पाऊस पडेल.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.